# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः22.10.2024** **वारःमंगळवार**

---

**ठळक बातम्या**

•विधानसभा निवडणुकीसाठीची अधिसूचना आज जारी होणार; उमेदवारी अर्ज भरायलाही आजपासून सुरुवात

•मनसे, वंचित बहुजन आघाडी, परिवर्तन महाशक्तीकडून विविध उमेदवारांची घोषणा

•महायुती आणि महाविकास आघाडीच्या जागावाटपाची अजूनही प्रतीक्षा

आणि

•गडचिरोली जिल्ह्यात पोलिसांबरोबर झालेल्या चकमकीत 5 नक्षलवादी ठार

**अधिसूचना**

राज्यातल्या विधानसभा निवडणुकीसाठीची अधिसूचना आज जारी करण्यात येईल. त्यानंतर आजपासूनच उमेदवारी अर्ज भरायला सुरुवात होणार आहे. 29 ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येतील. 30 ऑक्टोबरला अर्जांची छाननी होईल आणि 4 नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील. विधानसभा निवडणुकीसाठी 20 नोव्हेंबरला मतदान होईल आणि 23 नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे. नांदेड लोकसभा मतदारसंघाची पोटनिवडणूकही याच वेळापत्रकाप्रमाणे होणार आहे.

**मतदान केंद्र**

राज्यातल्या 288 मतदारसंघांसाठी 1 लाख 186 मतदान केंद्र तयार करण्यात येणार आहेत. त्यातली 42 हजार 604 केंद्र शहरी भागात आणि 57 हजार 582 ग्रामीण भागात आहेत. सर्वाधिक 8417 मतदान केंद्र पुणे जिल्ह्यात तर सर्वात कमी 921 मतदान केंद्र सिंधुदुर्ग जिल्ह्यात असतील. आतापर्यंत राज्यातल्या 9 कोटी 63 लाखांहून अधिक मतदारांची नोंद मतदार यादीत झाली आहे. त्यात सुमारे 5 कोटी पुरुष आणि 4 कोटी 66 लाखांहून अधिक महिला आहेत. सुमारे 1 कोटी 85 लाख मतदार 20 ते 29 वयोगटातले आहेत.

**उमेदवार-राजकारण**

विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरायला आजपासून सुरुवात होणार असली तरी महायुती आणि महाविकास आघाडीचं जागावाटप अजून जाहीर झालेलं नाही. भाजपाने 99 जागांवर; तर वंचित बहुजन आघाडीनं 83 जागांवर उमेदवार जाहीर केले आहेत. परिवर्तन महाशक्तीचे 10, मनसेचे 2 उमेदवार आतापर्यंत जाहीर झाले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस, एमआयएम, समाजवादी पक्ष यांनीही काही उमेदवार जाहीर केले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसनं आपल्या आघाडीच्या 27 प्रचारकांची यादी काल जाहीर केली. यात अजित पवार, सुनील तटकरे यांच्यासह अन्य नेत्यांचा समावेश आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनं विधानसभा निवडणुकीसाठी कल्याण ग्रामीण मतदारसंघातून राजू पाटील आणि ठाण्यातून अविनाश जाधव यांना उमेदवारी दिली आहे.

राज्यात नव्याने स्थापन झालेल्या परिवर्तन महाशक्ती आघाडीनं 10 उमेदवारांची आपली पहिली यादी जाहीर केली. यापैकी 8 जागा प्रहार जनशक्ती पक्षाला, तर दोन जागा स्वाभिमानी शेतकरी संघटनेला देण्यात आल्याची माहिती स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत दिली. यावेळी महाराष्ट्र स्वराज्य पक्षाचे प्रमुख छत्रपती संभाजीराजे, प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू आणि स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक उपस्थित होते.

वंचित बहुजन आघाडीनं काल आपली पाचवी यादी जाहीर केली. यात मुंबईतल्या 7 जागांचा समावेश आहे.

काँग्रेसच्या केंद्रीय निवडणूक समितीची बैठक नवी दिल्लीत काल झाली. यावेळी महाराष्ट्रातल्या विधानसभा निवडणुकांविषयी चर्चा झाली. राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे, सोनिया गांधी, राहुल गांधी, के. सी. वेणुगोपाल यांच्यासह राज्यातले नेते यावेळी उपस्थित होते. महाविकास आघाडीत 30 ते 40 जागांवर सहमती होण्यासाठी मुंबईत शरद पवार, उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा करणार असल्याचं काँग्रेसनं जाहीर केलं. काँग्रेसची 96 जागांवरची चर्चा पूर्ण झाली आहे. आज उमेदवारांची यादी जाहीर करण्याचा प्रयत्न असेल, असं काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी काल नवी दिल्लीत वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. शिवसेना आघाडीतून बाहेर पडणार या बातम्यात काहीही तथ्य नाही, भारतीय जनता पक्ष जाणीवपूर्वक विरोधी पक्षांबद्दल गैरसमज पसरवण्याचे प्रयत्न करत आहे, असा आरोप त्यांनी केला.

विधानसभा निवडणुकीसाठी रिपब्लिकन पक्षाला पाच ते सहा जागा द्याव्यात अशी मागणी महायुतीकडे केल्याचं रिपाइंचे अध्यक्ष आणि केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी वार्ताहरांना सांगितलं. आठवले यांनी काल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबईत त्यांच्या शासकीय निवासस्थानी भेट घेतली. यावेळी दोघांमध्ये जागावाटपाबाबत चर्चा झाली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशीही याबाबत चर्चा झाल्याचं आठवले म्हणाले.

**भाजपा**
भारतीय जनता पक्षानं पुण्यातील काही विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांची यादी जाहीर केल्यानंतर काल पुण्यात, महायुतीच्या घटक पक्षांची बैठक पार पडली.

**महायुती मेळावा**
जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर इथं काल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत महायुतीचा मेळावा झाला. यावेळी मुक्ताईनगरचे आमदार चंद्रकांत पाटील यांनी शिवसेनेत प्रवेश केला. यानंतर एकनाथ शिंदे यांनी महायुतीतर्फे त्यांची उमेदवारी जाहीर केली.

**निवडणूक-तक्रारी**
राज्यात विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठीची आचारसंहिता 15 ऑक्टोबरपासून लागू झाली; तेव्हापासून कालपर्यंत राज्यभरात सी-व्हिजिल ॲपवर एकंदर 776 तक्रारी आल्या असून त्यापैकी 773 तक्रारी निवडणूक आयोगाकडून निकाली काढण्यात आल्या आहेत, अशी माहिती राज्याचे अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी डॉक्टर  किरण कुलकर्णी यांनी दिली आहे.

**मतदान जागृती**
ऐरोली विधानसभा मतदारसंघातल्या घणसोली, कोपरखैरणे भागात काल मतदार जागृतीसाठी वेगवेगळे उपक्रम राबविण्यात आले. या निमित्ताने काढण्यात आलेल्या विदयार्थ्यांच्या फेरीत 500हून अधिक महाविद्यालयीन विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यांनी मतदानाचा संदेश दिला.

**पोलिस स्मृतीदिन**
राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल पोलीस स्मृतिदिनानिमित्त हुतात्मा पोलीसांना पुष्पचक्र वाहून श्रद्धांजली अर्पण केली. पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला, बृहन्मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसळकर, यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि अन्य मान्यवरांनीही हुतात्म्यांना श्रद्धांजली वाहिली. यावेळी पोलीस बँड पथकानं सलामी शस्त्र धून वाजवून आणि बंदुकीच्या तीन फैरी झडत हुतात्म्यांना सलामी दिली.

**गडचिरोली**
गडचिरोली पोलिसांनी काल छत्तीसगड राज्याच्या सीमेवरील भामरागड तालुक्यातील जंगलात मोठी कारवाई केली. कोपर्शी गावानजीक पोलिस आणि नक्षलवादी यांच्यात काल झालेल्या चकमकीत, 5 नक्षलवादी ठार झाले, तर, एक जवान किरकोळ जखमी झाला आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत घातपात करण्याच्या उद्देशाने हे नक्षलवादी एकत्र आले होते असं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

**तुकडोजी महाराज**

राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांच्या 56व्या पुण्यतिथी निमित्त, अमरावतीच्या गुरूकुंज मोझरीत काल त्यांना मौन श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर सर्वधर्म प्रार्थनाही करण्यात आली. श्रद्धांजली कार्यक्रमाला विविध राजकीय नेत्यांसह महाराजांचे देश-परदेशातील अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**नाशिक-व्हॉलीबॉल स्पर्धा**

14 वर्षे वयोगटातील मुला - मुलींच्या राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धांना काल नाशिकमध्ये सुरुवात झाली. राज्याचं क्रीडा आणि युवक सेवा संचालनालय तसंच नाशिक जिल्हा क्रीडा परिषदेच्या वतीने या स्पर्धा घेण्यात येत आहेत. जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी या स्पर्धेचं उद्घाटन केलं. मुलांच्या गटात कोल्हापूर आणि लातूर विभागाच्या संघांनी आपले दोन सामने जिंकून उपांत्य फेरी गाठली. तर मुलींच्या गटात कोल्हापूर, नागपूर, लातूर आणि पुणे या संघांनी विजयी सुरवात केली.

**पाऊस**

गेल्या दोन दिवसांत, नाशिक जिल्ह्याच्या विविध भागात मुसळधार पाऊस झाला. परतीच्या पावसाचा ग्रामीण भागातील शेतीकांना मोठा फटका बसला असूंन, मुख्यतः मका, कांदा भात तसंच द्राक्ष पिकांचं नुकसान झालं आहे. जिल्ह्यातील 38 हजार 544 हेक्टर क्षेत्रावरील पिकांचं नुकसान झालं असल्याचा प्राथमिक अंदाज असल्याची माहिती नाशिकचे जिल्हा कृषी अधीक्षक कैलास शिरसाट यांनी दिली आहे. सांगली जिल्ह्यातील तासगाव, कवठेमहांकाळ, पलूस तालुक्यातही काल रात्री मेघगर्जनेसह जोरदार पाऊस झाला.

**हवामान**

येत्या 24 तासात कोकण, मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यात पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**